जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 NOV 2017
लोकमत



वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी येथे झालेल्या इंद्रधनुष्य युवा महोत्सवात द्वितीय क्रमांकाचे सर्वसाधारण विजेतेपदाचा करंडक मान्यवरांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाचा संघाने गुरुवारी स्वीकारला.

# शिवाजी विद्यापीठास सर्वसाधारण उपविजेतेपद

लोकमत न्यूजनेटवर्क

**कोल्हापूर :** परभणीत वसंतराव नाईक कृषी विद्यापीठात झालेल्या इंद्रधनुष्य युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाने १९ पैकी १२ प्रकारांत यश मिळवत दुसऱ्या क्रमांकाचे सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. महोत्सवात शिवाजी विद्यापीठाच्या ह्रषिकेश देशमाने यास 'गोल्डन बॉय' म्हणून गौरविण्यात आले.

या महोत्सवात शिवाजी विद्यापीठ संघाने कातरकाम (प्रथम), मातीकाम (द्वितीय), भित्तीचित्र ( प्रथम), लघुनाटिका (प्रथम), वाद्यवृंद (प्रथम), वेस्टर्न ऑर्केस्ट्रा (तृतीय), समूहगीत (तृतीय), सूरवाद्य (प्रथम), तालवाद्य (प्रथम), शास्त्रीय गायन (तृतीय), लोकनृत्य (द्वितीय), मूकनाट्य ( द्वितीय), फाईन आर्टमध्ये विजेतेपद, तर एकूण स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे सर्वसाधारण विजेतेपदाचा मान पटकाविला. विद्यापीठाचा विद्यार्थी ह्रषिकेश देशमाने यास 'गोल्डन बॉय' म्हणून गौरविण्यात आले. या संघास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील, डॉ. टी. के. शिंदे, बबन शिंदे, प्रा. वेळेकर, शुभांगी कांबळे आदींचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 NOV 2017
पुण्यनगरी

# विद्यापीठात १७ पासून 'आवाज' कार्यशाळा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग सातत्याने विविध स्वरुपाच्या कौशल्यावर आधारित कार्यशाळेचे आयोजन करीत असते. त्यापैकी 'आवाज' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यशाळेचा उपयोग आवाजाच्या संस्काराबरोबरच व्यक्तीच्या मनातील बोलण्याची भीती कमी होणे, त्यांचा आत्मविश्वास वाढवणे त्यासाठी प्रत्येक व्यक्तीला प्रात्यक्षिक कार्य व आवाजाचा रियाज करून घेतला जाणार आहे.

कार्यशाळेमध्ये सहभागी होणाऱ्याला आपल्या आवाजातील फरक आणि आवाज चांगला करण्यासाठी संधी मिळणार आहे. ही कार्यशाळा दि. १७, १८ आणि १९ नोव्हेंबर या कालावधीत सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत आयोजित केली आहे. त्यासाठी विभागामध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू आहे.

या तीनदिवसीय कार्यशाळेमध्ये आवाज निर्मिती, उच्चार, आवाजातील चढउतार, जीभ, जबडा, गाल, डोळे, ओठ, घशाचे व्यायाम, बोलण्यानुसार हातवारे, देहबोली, माईक जजमेंट प्रात्यक्षिक, श्वासाचे व्यायाम, सिंहमुद्रा, नृत्य, इंप्रुव्हायझेशन यांचा समावेश आहे.

या चर्चासत्रात या सर्व मुद्यांवर चर्चा होऊन प्रात्यक्षिक करून घेतले जाणार आहे. ही कार्यशाळा रेडिओ जॉकी, डबिंग, अभिनय, सूत्रसंचालन, गायन, वक्तृत्व, मार्केटिंग, शिक्षक, वकील, राजकारण, प्राध्यापक, मुलाखत तंत्र, गृहिणी, पालक, शेवटी आवाजाविषयी कुतूहल असणारे सर्वजण, नोकरीत, व्यवसायात आणि महत्त्वाचे आपल्या कुटुंबात बोलण्यासाठी व कुटुंबात सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण करण्यासाठी उपयोगी आहे. त्या अनुषंगाने या कार्यशाळेस गेली २५ वर्षे अभिनय, डबिंग, सूत्रसंचालन, मोटिवेशनल स्पीकर, व्हॉईस ओव्हर क्षेत्रात काम केलेले व्हॉईस डॉक्टर निनाद काळे हे तज्ज्ञ मार्गदर्शक लाभणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 NOV 2017
पुढारी

# हिवाळी प्रथम सत्रातील परीक्षांच्या तारखेत बदल

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

हिवाळी प्रथम सत्रातील शुक्रवार (दि. १७) रोजी होणाऱ्या विद्यापीठाच्या सर्व परीक्षांच्या तारखांमध्ये बदल करण्यात आला असून, या परीक्षा आता २६ नोव्हेंबर रोजी होणार आहेत.

विद्यापीठाच्या हिवाळी परीक्षांना पूर्ण क्षमतेने सुरुवात झाली आहे. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.एड., बी.टेक, एम.पी.एड., लॉ., बी.डेस्., एम.बी.ए., एम.ए., एम.कॉम., अभियांत्रिकी व बी.फार्मसी या अभ्यासक्रमांच्या एसआरपीडी व पारंपरिक परीक्षा दि. १७ नोव्हेंबर रोजी होणार होत्या. परंतु, त्याच दिवशी विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निवडणुका आहेत. निवडणुकीचे मतदान संलग्नित विविध महाविद्यालयांमधील मतदान केंद्रांवर होणार आहे. मतदान केंद्रांवर अन्य महाविद्यालयांतील शिक्षक, प्राचार्य व संस्थाचालकांना त्या-त्या केंद्रावर मतदान करावे लागणार आहे. विद्यापीठ अधिकार मंडळ निवडणुकीमुळे विद्यापीठाच्या परीक्षा केंद्रावर बैठक व्यवस्था करणे अडचणीचे होणार आहे. त्यामुळे परीक्षा तारखांमध्ये बदल करण्यात आला आहे.



> “ विद्यापीठ अधिकार मंडळ निवडणुकांमुळे १७ नोव्हेंबरच्या परीक्षा तारखांत बदल करण्यात आला आहे. वरिष्ठ पर्यवेक्षकांनी तारखेचा बदल तत्काळ करून योग्य ती दक्षता घ्यावी. हा बदल विद्यार्थ्यांच्या लक्षात द्यावा. १७ नोव्हेंबरच्या प्रश्नपत्रिका वितरणाचा लॉट दि. १६ रोजी वितरण होईल.
>
> **– महेश काकडे**, संचालक
> परीक्षा व मूल्यमापन मंडळ